## स्वारस्य अभिव्यक्ती प्रक्रिया

अनुसूचित जमातीच्या विदयार्थ्यांना इंग्रजी माध्यमातुन दर्जेदार शिक्षण (CBSE Board) देणेकरीता केंद्र शासनामार्फत भारतीय संविधाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जातो. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यात इंग्रजी माध्यमाच्या २५ एकलव्य निवासी शाळा मंजुर असुन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमांच्या एकलव्य रेसीडेंन्सीअल स्कुल मधील इयत्ता ६ वी च्या वर्गात नियमीत प्रवेश तसेच इयत्ता ७ ते ९ वी च्या वर्गातील विदयार्थ्यांच्या रिक्त जागेवर प्रवेश देणेकरीता संगणक प्रणालीचा अवलंब करुन स्पर्धा परीक्षा आयोजित करणेबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर परीक्षेकरीता राज्यातुन अंदाजे १० ते १२ हजार विदयार्थी परीक्षेस बसणार आहेत.

संगणकाधारीत विविध स्पर्धा परीक्षा घेण्याचे कामकाज आपल्या यंत्रणेमार्फत करण्यात येत असल्याने सदरच्या परीक्षा आपल्या स्तरावरुन आयोजित करणेसाठी व त्याअनुषंगाने आवश्यक सेवा उपलब्ध करुन देणेकरीता आकारण्यात येणारे शुल्क / दरपत्रके एक आठवडयाच्या आत या कार्यालयास बंद लिफाफयाद्वारे " सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी, नाशिक तथा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक" यांचे नावे पुढील नमुन्यात समक्ष सादर करावेत. आपले दरपत्रके दिनांक १५ जानेवारी, २०२० पर्यत या कार्यालयास पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

### संस्थेमार्फत दयावयाचा सेवांचा तपशिल

| अ.क्र. | सेवेचा तपशिल |
|---|---|
| १ | कार्यालयामार्फत Excel Sheet द्वारे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या आधारे परीक्षा प्रवेश पत्र तयार करुन विदयार्थ्यांना पालकांच्या पत्यांवर उपलब्ध करुन देणे. |
| २ | प्रकल्प निहाय प्राप्त अर्जानुसार जिल्हा / तालुका निहाय परीक्षा केंद्र निश्चित करणे. तसेच आवश्यकता असल्सास दोन तासाच्या बॅचेच प्रमाणे नियोजन करणे. |
| ३ | कार्यालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली अधिक प्रश्न पत्रिकाचे संच पुढील आवश्यक सुचनेनुसार अपलोड करणे, इयत्तेनिहाय उपलब्ध प्रश्नपत्रिका स्वतंत्र उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ४ | परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विदयार्थ्यांची परीक्षेपुर्वी एक तास अगोदर सराव परीक्षा घेणे व मार्गदर्शन करणे, त्यानंतर प्रत्यक्ष परीक्षेचे आयोजन करणे. परीक्षा केंद्राचे सी.सी.टी.व्ही. फुटेज उपलब्ध करुन देणे. |
| ५ | परीक्षा कालावधीत सर्व आवश्यक तांत्रिक सोयी सुविधा / जनरेटर व इतर अनुषंगीक यंत्रणा उपलब्ध करणे. |
| ६ | परीक्षा दिनाकापुर्वी १५ दिवस अगोदर विदयार्थ्यांना परीक्षेचा सराव करण्याकरीता आपल्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन देणे. |
| ७ | प्रत्येक परीक्षा केंद्रावर सुरु असणाऱ्या परीक्षे संदर्भात अद्यावत माहिती कार्यालयास उपलब्ध होण्यासाठी राज्य स्तरावर / विभाग स्तरावर ऑनलाईन लिंक उपलब्ध करुन देणे. |
| ८ | परीक्षा केंद्रावरील भौतिक योयी सुविधा, फर्निचर, पिण्याचे पाणी तसेच इतर अनुषंगीक सेवा पुरविण्याची जबाबदारी संस्थेची राहील. |
| ९ | इतर अनुषंगिक सेवा. |

परीक्षा सुरु असतांना परीक्षेची वेळ दर्शविणारा Tab विदयार्थ्यांला समोर दिसणे आवश्यक राहील. प्रश्न संचाची सुरक्षितता व परीक्षेसंदर्भातील गोपणियता राखणे आवश्यक राहील. त्यासंदर्भात उद्भवणाऱ्या कायदेशीर बाबींची जबाबदारी संस्थेंची राहील. परीक्षे नंतर प्रत्येक शाळानिहाय ३० मुले व ३० मुली यांची निवड यादी गुणानुक्रमे तयार करुन देणे आवश्यक राहील. परीक्षा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर आवश्यक ते सर्व कागदपत्र या कार्यालयास सादर करण्यात यावीत. यासाठीच्या दरपत्रकाबरोबर अर्जदार संस्थेने मान्यताविषयक व इतर आवश्यक कागदपत्रे लिफाफ्यामध्ये सादर करावीत स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणाऱ्या संस्थांनी दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक, आदिवासी विकास भवन, पहिला मजला गडकरी चौक नाशिक-०२ येथे सकाळी ११.०० वा. उपस्थित राहावे. त्याच दिवशी तज्ञ समितीपुढे संस्थांचे सादरीकरण घेण्यात येईल. संस्था निश्चित करण्याचा अंतिम निर्णय सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी, नाशिक तथा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना राहील.

उपरोक्त् प्रमाणे उल्लेख केलेल्या सेवांचा सर्वकंष विचार करुन प्रती विदयार्थी होणाऱ्या खर्चाचे संकलीत दरपत्रक सादर करावेत. याबाबत अधिक माहितीसाठी श्री. अविनाश चव्हाण, सहाय्यक आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक मो. ९०४९४१७९९९यांच्याशी संपर्क साधावा.

Ksm

सदस्य सचिव,
महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी नाशिक
तथा आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक